पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४०१ दिनांक - ३१/०५/२०२३**

**अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर**

**मेफेड्रॉन (एम.डी.) व बंटा या अंमली पदार्थाची विक्री करण्या करीता आलेल्या परप्रांतीय तरुणास लोणी-काळभोर परिसरातुन चारचाकी वाहनासह केले जेरंबद त्याचेकडुन एकुण २६,३०,२००/- रुपये किंचा १०१ ग्रॅम ०१० मिलीग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) तसेच ६१० ग्रॅम बंटा व इतर ऐवज असा एकुण ३६,४६,२००/- रु किंचा अंमली पदार्थाचा साठा जप्त**

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कायदा व सुव्यस्था मुंबई यांनी दि.११/०५/२०२३ रोजी ते दि.१५/०६/२०२३ रोजीपर्यंत अंमली पदार्थ व गुटखा याबाबत विशेष मोहिम राबविणेबाबत तसेच अंमली पदार्थ तस्करीस आळा घालण्याच्या दृष्टीने कडक कारवाई करण्याच्या सुचना व आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दिलेले आदेश व सुचनानुसार अंमली पदार्थ विरोधी पथक-०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर व स्टाफ यांना त्याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्यानुसार दिनांक ३०/०५/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक-१ कडील अधिकारी व स्टाफ लोणी-काळभोर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना,**पोलीस अंमलदार**, **योगेश मोहिते व विशाल शिंदे** यांना एक परप्रांतीय इसम हा मेफेड्रॉन (एम.डी.) व बंटा या अंमली पदार्थाची विक्री करण्या करीता पुणे-उरळी-कांचन रोडने प्रयागधाम ट्रस्ट चॅरिटेबल हॉस्पिटल बस स्टॉप शेजारी सार्वजनिक रोडवर येणार असल्याची माहिती मिळाली.

अंमली पदार्थ विरोधी पथक-१ कडील अधिकारी व स्टाप यांनी त्यांना मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सापळा रचुन थांबले असता,त्याठिकाणी इसम नामे **जितेंद्र सतीशकुमार दुआ,वय-४० वर्षे,रा.ड्रिम्स निवारा सोसायटी,उरुळी-कांचन,पुणे,मुळ रा.मुखर्जी पार्क,तिलकरनगर,वेस्ट दिल्ली** हा एका चारचाकी गाडीजवळ संशयीतरीत्या उभा असल्याचे मिळुन आल्याने त्याची व त्याचे ताब्यातील चारचाकी गाडीची झडती घेतली असता,त्यामध्ये **३६,४६,२००/-रू किचा ऐवज त्यामध्ये २० ग्रॅम ६७० मिलीग्रॅम पांढरे क्रिस्टल स्वरुपातील मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ ४,१३,४००/- रू किचा, ८० ग्रॅम ३४० मिलीग्रॅम ब्राऊन क्रिस्टल स्वरुपातील मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ १६,०६,८००/-रू किचा, तसेच ६१० मिलीग्रॅम बंटा हा अंमली पदार्थ ६,१०,०००/-रू किचा, ४०००/- रूपये रोख रक्कम, दोन इलेक्ट्रॉनिक वजन काटा रु.२,०००/- व ०३ मोबाईल फोन किंरु.१०,०००/-, एक चारचाकी गाडी क्र.एमएच/०४/जीई/८१२० रू १०,००,०००/- किची असा ऐवज एम.डी. व बंटा** या अंमली पदार्थासह अनाधिकाराने,बेकायदेशिररित्या विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्याचेविरुध्द लोणी-काळभोर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विनायक गायकवाड, सहा.पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर, पोलीस अंमलदार योगेश मोहिते, विशाल शिंदे, सुजित वाडेकर, पांडुरंग पवार, ज्ञानेश्वर घोरपडे, प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, संदिप शिर्के, राहुल जोशी, संदेश काकडे, नितेश जाधव, सचिन माळवे, रेहाना शेख यांनी केली आहे.